
# शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त शिवजागर सोहळा



**बुलढाणा**, दि. ५ (प्रतिनिधी)

शिवराज्याभिषेक सोहळ्यास यावर्षी ३५० वर्ष पूर्ण होत आहेत. जगातील पहिले अलौकिक रयतेचे राज्य अठरापगड जातींना सोबत घेऊन छत्रपती शिवरायांनी निर्माण केले. शिवराज्याभिषेक ३५० वर्षे पूर्ण होण्याचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र बुलढाणा, शिवराज शिक्षण संस्था, अंत्री तेली व सह्याद्री प्रतिष्ठान मुळशी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजागर सोहळा ८ जून रोजी आयोजित केला आहे.

याप्रसंगी शिवराज्यभिषेक भारताच्या इतिहासातील असामान्य घटना या ग्रंथाच्या औचित्याने विचार मंथन व व्याख्यान आयोजित केले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष आ.डॉ. राजेंद्र शिंगणे राहतील. तसेच उद्घाटन आ. धीरज लिंगाडे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून अनिल पवार, शिवराज्याभिषेक ग्रंथाचे संकल्प तथा अध्यक्ष सह्याद्री प्रतिष्ठान मुळशी, पुणे व चेतन कोळी लेखक, संपादक व प्रकाशक हे असणार आहेत. शिवजागर सोहळा हा कार्यक्रम ८ जूनला सकाळी साडेअकरा वाजता राष्ट्रवादी वेल्फेअर्स इमारतीत पार पडणार आहे. या सोहळ्यास शिवप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन यशवंतराव चव्हाण सेंटरचे सचिव नरेश शेळके यांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner

# शिवराय हे जागतिक स्तरावरील युगपुरुष : चेतन कोळी

**बुलढाणा,** दि. १८ (प्रतिनिधी)



शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रातील राज्याभिषेकाची घटना ही इतिहासाचा प्रवाह बदलण्यास कारणीभूत ठरली. महाराजांच्या मृत्यूनंतरही कित्येक वर्षे मुघलांच्या सत्तेला भिडण्याचे आणि दिल्लीचे तख्त राखण्याचे असामान्य शौर्य व धैर्य मराठे दाखवू शकले, याची प्रेरणाबीजे राज्याभिषेकाच्या घटनेत आहेत. राज्याभिषेकाने केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिक क्षेत्रांतही उत्क्रांती घडली. शिवराय हे केवळ राष्ट्रपुरुष नव्हते तर ते जागतिक स्तरावरील युगपुरुष होते, असे मत चेतन कोळी यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान बुलढाणा केंद्र, शिवराज शिक्षण संस्था अन्त्री तेली व सह्याद्री प्रतिष्ठान मुळशी,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक राष्ट्रवादी भवनात पार पडलेल्या 'शिवजागर' या उपक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटक आ. धीरज लिंगाडे, अध्यक्षस्थानी ॲड. विजय सावळे तर मुख्यवक्ते म्हणून अनिल पवार, शिवराज्याभिषेक ग्रंथाचे संकल्प चेतन कोळी हे होते. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकातून नरेश शेळके यांनी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राच्या कार्याबाबत प्रकाश टाकतांना सांगितले की, शिवरायांचे कार्य फक्त अफजल खानाचा कोथळा काढणे, शाहिस्तेखानाची बोटे कापणे अशा रंजक कथांपुरते मर्यादित नसून त्यांनी जगातील पहिले अलौकिक रयतेचे राज्य निर्माण केले. त्यांच्या कार्याचे विविध पैलू अभ्यासपूर्ण समजून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. अनिल पवार यांनी शिवराज्याभिषेक भारताच्या इतिहासातील असामान्य घटना या ग्रंथाच्या निर्मितीबाबत माहिती सांगितली. आ. धीरज लिंगाडे व विजय सावळे यांची समायोजित भाषणे झाली. याप्रसंगी डॉ.गायत्री सावजी यांनी शिवरायांच्या कार्याबाबतचा देखावा निर्माण केला होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाहीर सज्जनसिंग व विक्रांत राजपूत या पिता-पुत्रांनी महाराष्ट्र गीत व शिव वंदना सादर केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. रामकृष्ण मस्के, डॉ.अण्णासाहेब म्हळसणे, ज्ञानेश्वर वायाळ, डॉ.विजयाताई काकडे, शंकर महाराज, डॉ.ज्योती खेडकर, डॉ.गायत्री सावजी, उर्मिला बावस्कर, विजय गवारगुरू, प्रा. अंजली गाढे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन उर्मिला बावस्कर यांनी केले. यावेळी प्रा. गजानन जाधव, विजयसिंग राजपूत, माधवराव हुडेकर, देविदास जाधव, लक्ष्मी शेळके, अनिता शेळके, अनिल बावस्कर, तुळशीराम काळे, प्रतिभा भुतेकर, प्रा. संगीता काळाने, रफिक कुरेशी, विजया कोळसे उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner